# भारतीय राजदूतांनी केली मेट्रो-३ची पाहणी

**मुंबई : प्रतिनिधी**

विविध देशांचे भारतीय राजदूत आणि उच्च्यायुक्त यांची मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) आझाद मैदान येथे गुरुवारी पाहणी भेट आयोजित केली होती. परदेशात कार्यरत असलेल्या भारतीय उच्चाधिकाऱ्यांच्या राज्य दौऱ्याचा मेट्रो प्रकल्प पाहणी एक भाग होता. त्यांना मुंबई मेट्रो-३ या प्रकल्पाविषयीची सखोल माहिती करून देणे हा या भेटीमागचा उद्देश असल्याचे स्पष्ट केले.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या कामाची विविध देशांचे भारतीय राजदूत आणि उच्च्यायुक्त यांनी पाहणी केली. या पाहणीदौऱ्या दरम्यान उच्च्याधिकाऱ्यांनीयाउपक्रमांतर्गतवापरण्यात आलेल्या आंतर्राष्ट्रीय दर्जाचे तंत्रज्ञान, अंमलबजावणीतील आव्हाने आणि प्रकल्पाची सर्वांगीण उपयुक्तता यांची माहिती घेतली. या



दौऱ्यामध्ये एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी मुंबई मेट्रो मार्ग-३ या प्रकल्पाची सविस्तर माहिती दिले.

राजदूत आणि उच्च्यायुक्त यांचा हा पाहणी दौरा मेट्रो-३ टीमसाठी प्रेरणादायी आहे. महाराष्ट्र शासनाने या उपक्रमात मुंबई मेट्रो मार्ग-३ चा समावेश केला ही अभिमानाची आणि सन्मानाची बाब आहे, असे भिडे म्हणाल्या. यावेळी सौदी अरेबियातील भारतीय राजदूत अहमद जावेद, कोलंबियातील भारतीय राजदूत रवी बांगर, बेलारूसमधील भारतीय राजदूत संगीता बहादूर, डेन्मार्क मधील भारतीय राजदूत अजित विनायक गुप्ते, ट्यूनेशियातील भारतीय राजदूत प्रशांत पिसे , कोरियातील भारतीय राजदूत अतुल एम गोतसूर्वे, तुर्कमिनिस्थानातील भारतीय राजदूत अझर ए एच खान, युक्त विश्वास विदू सपकाळ हे अधिकारी उपस्थित होते.